दि. १९/११/२०२४

# प्रेसनोट

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून महावितरण उपविभाग कार्यालय, धनकवडी, पुणे येथील प्रशिक्षणार्थी याचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४४ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आशिष ज्ञानोबा क्षीरसागर, वय २५ वर्ष, पद – प्रशिक्षणार्थी, महावितरण उपविभाग कार्यालय, धनकवडी, पुणे. (इ.लो.से.) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,०००/- (एक हजार) रुपये |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ८००/- (आठशे) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ८००/- (आठशे) रुपये |
| पडताळणी दिनांक | १४/११/२०२४ |
| सापळा दिनांक | १९/११/२०२४ रोजी. |
| ठिकाण | महावितरण उपविभाग कार्यालय, धनकवडी, पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९९२३४४४९९८) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी त्यांचे आईच्या नावावर एक फ्लॅट खरेदी केला होता. सदर फ्लॅटच्या लाईट बिलावरील पूर्वीच्या मालकाचे नाव बदलून त्यांच्या आईचे नाव लावण्यासाठी आणि त्यासाठी लागणारी कागदपत्रे महावितरणच्या ऑनलाईन साईटवर अपलोड करुन देण्यासाठी इ.लो.से. आशिष क्षीरसागर यांनी तक्रारदार यांचेकडे १,०००/- रुपयाच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी दि. १४/११/२०२४ रोजी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या प्राप्त तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान इ.लो.से. आशिष क्षीरसागर यांनी दि. १४/११/२०२४ रोजी तक्रारदाराच्या वरील कामासाठी तक्रारदाराकडे ८००/- रुपयाच्या लाचेची मागणी करुन, ती लाच रक्कम ८००/- रुपये आज दि. १९/११/२०२४ रोजी इ.लो.से. आशिष क्षीरसागर यांनी तक्रारदाराकडून पंचासमक्ष स्विकारले असता त्याना रंगेहाथ पकडण्यात आलेले असून, त्यांचेविरुद्ध सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम,सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

19/11/24

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner